

रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली



दिनांक : २६ जून २०२१

## मराठी विभाग

## राजर्षी छ. शाहू महाराज जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन व्याख्यान

### अहवाल

शनिवार दि. २६ जून २०२१ रोजी राजर्षी छ. शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून गुगल मीट या अभासी माध्यमाद्वारे ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले. तत्पूर्वी मराठी विभाग आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मा. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या हस्ते राजर्षी शाहूंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर १० वाजता मराठी विभागाच्या वतीने 'राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याची आजच्या संदर्भातील प्रस्तुतता' या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख वक्ते म्हणून जेष्ठ विचारवंत डॉ. टी. एस. पाटील लाभले होते. त्यांनी आपल्या विचारामध्ये शाहू महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

आपल्या विचारमंथनात टी. एस. पाटील म्हणाले, ''शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने लोकराजे होते. ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी शाहू राजांनी कृतिशील प्रयत्न केला. सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता त्यांनी दलित (अस्पृश्य) व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. सक्तीचे प्राथमिक शिक्षण, नोकऱ्यांमध्ये आरक्षण, शेती सुधारणेस प्रोत्साहन, पाणी व्यवस्थापनासाठी धरणांची बांधणी करून बहुजन समाजाच्या कल्याणाचे पायाभूत कार्य केले आहे. आजच्या पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे.''

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी आपल्या अध्यक्षिय मनोगतात, राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले, 'राजर्षी शाहू महाराजांनी खऱ्या अर्थाने जातीनिर्मूलन, अस्पृशता निवारण, सक्तीचे शिक्षण, आधुनिकीकरणासाठी पाठबळ देऊन आजच्या यशस्वी महाराष्ट्राचे चित्र निर्माण केले आहे. राजर्षींच्या विचारांना आपण आपल्या सामाजिक जीवनात उतरवणे हेच अभिवादन होईल.'' अशाप्रकारे प्रस्तुत कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. तेजस चव्हाण यांनी केले. आभार प्रा. दिलीप कोने यांनी मानले, तर सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले.

**निष्पत्ती :** राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनाचा परिचय झाला.

**लाभार्थी :** ६५







प्राचार्य

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)